नावावर आहेत. त्यामुळे त्या त्या ऋषींच्या नावानेही या वेदाला संबोधण्यात. येते. अथर्वण ऋषींच्या १७६८ ऋचा यात आहेत.

(२) **ब्रह्मवेद–** ब्रह्म ऋषींच्या एकूण ९६७ ऋचा या अथर्ववेदात आहेत. 'ब्रह्मवेद' या नावाचा उल्लेख अथर्ववेदातच आहे.

(३) **अंगिरोवेद– ता उपदिशति अंगिरसो वेद:** असा शतपथात उल्लेख आढळतो.

(४) **अथर्वांगिरसावेद–** हे नावही अथर्ववेदातच आढळते.

(५) **भृग्वंगिरसां वेद– एतद् वै भूयिष्ठं ब्रह्म यद् भृग्वंगिरस:।** असा उल्लेख गोपथामध्ये आहे. भृग्वंगिरस ऋषींच्या एकूण ७६० ऋचा या अथर्ववेदात आहेत.

(६) **क्षत्रवेद–** याचा उल्लेख शतपथ ब्राह्मणामध्ये आढळतो. स्वत:चे, समाजाचे वा राष्ट्राचे रक्षण करणे यासारखी महान क्रिया नाही. हे रक्षण कोणत्याप्रकारे करावे याची चर्चा या वेदात विस्ताराने दिलेली असून विशेषत: अरिष्टनाश, राज्यशासन, विजयसाधन, संग्राम, शत्रूनाश इत्यादी विविध विषयांवरची सूक्ते या वेदात आलेली आहेत. त्यामुळेच याला 'क्षत्रवेद' हे नाव देण्यात आले असावे.

(७) **भैषज्यवेद–** याचा उल्लेख अथर्ववेदामध्येच आढळतो. आयुष्यवृद्धी, रोगनिवारण, विविध औषधी वनस्पतींचा उपयोग व परिणाम, कृमिनाश व विषनाश वगैरे विषयांचे स्पष्टीकरण करणारी सूक्ते या वेदात समाविष्ट केलेली आहेत. हा सर्व वैद्यकीय शास्त्रातील भाग असल्यामुळे याला 'भैषज्यवेद' असेही म्हटले जाते.

वैद्यकीय शाखेतील विषयाची माहिती देताना त्या त्या वस्तूची ओळख, त्या वस्तूचा उपयोग, प्रक्रिया किंवा प्रयोग याचाही परिचय अथर्ववेदातील ऋचा आपल्याला करून देतात. प्रयोग वस्तूच्या विज्ञान शाखेच्या प्रज्ञावंतांना या वेदाद्वारे बहुमोल अशी देणगीच मिळाली आहे, असे म्हणावे लागेल.

अथर्ववेदाच्या एकूण पंधरा शाखा आहेत, असे म्हटले जाते. पण प्रत्यक्षात त्यापैकी फक्त दोनच शाखा आज उपलब्ध आहेत– एक पिप्पलाद ऋषींच्या नावावर मोडणारी **'पिप्पलाद'** व दुसरी शौनक ऋषींच्या नावावर मोडणारी **'शौनकी'**. बाकी शाखा आज उपलब्ध नाहीत. प्रस्तुतचे भाषांतर हे शौनकीय संहितेचे आहे.

या वेदामध्ये एकूण ५९८७ ऋचा आहेत. हे सर्व मंत्र किंवा ऋचा २० काण्डांमध्ये व ७३० सूक्तांमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. या वेदात अनेक ऋचा ऋग्वेदातील आहेत. याचा विस्तारही ऋग्वेदाखालोखाल आहे.

**विषय:** अथर्ववेद सांसारिकांसाठी उपयुक्त ठरावा असा आहे. यात स्वत:चे सर्व बाजूंनी रक्षण कसे करावे, वैभव वृद्धिंगत कसे करावे, याप्रमाणेच राजा, राज्य, युद्ध, राजधर्म, समाजप्रबोधन असे अनेक विषय हाताळले गेले आहेत. त्याचे स्थूलस्वरूप पुढीलप्रमाणे–

(१) अध्यात्म (२) ब्रह्मचर्य
(३) गृहस्थाश्रम (४) वानप्रस्थ
(५) संन्यास (६) आयुर्वर्धन (७) भैष्यज (औषधी) (८) रोगनिवारण
(९) कृमिनाशन (१०) विषनाश
(११) अरिष्टनाश (१२) राज्य-शासन
(१३) राष्ट्रसंवर्धन (१४) संग्राम
(१५) शत्रूनाश (१६) मणिधारण
(१७) पापनाश (१८) अन्न (१९) संपत्ती
(२०) अधिदैवत (२१) यज्ञ (२२) काल
(२३) पशुसंपत्ती (२४) व्यापार

यात तंत्रज्ञानविषयक मंत्र आहेत. त्याचप्रमाणे अभिचार, मंत्रतंत्र, वशिकरण, मंत्रसिद्धी, जादुटोणा, गंडेदोरे, क्रियास्तंभन इत्यादी विषयांचा समावेश असून ते अत्यंत परिणामकारक असेच आहेत. परंतु त्या विषयांची माहिती पूर्णत्वाने करून घेतल्याशिवाय त्यांच्या वाटेस जाऊ नये, असा इशारा त्यात देण्यात आलेला आहे. औषधी वनस्पती, त्यांचे रोग, त्यांचे स्वरूप व परिणाम, तसेच शस्त्रास्त्रे वापरणे व अन्य शस्त्रांचा नाश करणे याबद्दल क्रिया व मंत्रही या वेदात देण्यात आलेले आहेत.

**ऋषी–** या अथर्ववेदातील सूक्ते रचणाऱ्या ऋषींची संख्या एकूण १२९ आहे. उपासना, कर्म व ज्ञान यांच्या प्राप्तीकरिता ह्या ऋषींच्या प्रयत्नाने संहिता, ब्राह्मण, उपनिषदे, आरण्यके निर्माण झाली.

ब्राह्मण ग्रंथ– गोपथब्राह्मण (यज्ञादि कर्मांसाठी)

उपनिषदे– प्रश्न, मांडुक्य आणि मुंडक (ज्ञानासाठी)

श्रौतसूत्रे– वैतान (उपासना व प्रबोधन कार्य)

गृह्यसूत्रे– कौशिक (सांसारिक कर्म)

उपवेद– सर्प, पिशाच, असुर, स्थापत्य, इतिहास, पुराण (आचारादि वैदिक क्रियांचे दर्शन). या वेदांची आरण्यके नाहीत.

**देवता–** ऋग्वेदातील सर्वच देवतांचा समावेश या वेदात नसला तरी इंद्र, अग्नि, यम, रूद्र वगैरे ऋग्वेदातील देवतांना उद्देशून केलेल्या प्रार्थना अथर्ववेदातही आढळतात. मात्र ऋग्वेदातील ऋचांप्रमाणे ह्या देवतांचे गौरवी दर्शन ह्या ऋचांच्या माध्यमातून झालेले दिसत नाही.

प्राचीन काळापासून ऋग्वेद किंवा यजुर्वेदाचा ज्याप्रमाणे व जितका अभ्यास होत आहे तितका अभ्यास या वेदाचा झालेला आढळत नाही आणि ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेदाइतका बहुमानही ऋषीगणांनी या वेदाला दिलेला दिसत नाही. तरीही त्यामध्ये ज्यांचा नामगौरव केला जातो त्या नऊ ऋषींची नावे पुढीलप्रमाणे आहेत–
(१) पिप्पलाद (२) वौदा (३) मौदा
(४) शौनक (५) जाजल (६) जलद्
(७) ब्रह्मवदा (८) देवदर्श (९) चारणवैद्य

## प्रथम काण्ड

या काण्डात ३५ सूक्ते असून ऋचांची किंवा मंत्रांची संख्या १५३ आहे. विविध विषयांवरील प्रार्थना यात समाविष्ट केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे शत्रूपासून संरक्षण, युद्धात विजय, रोगनाश, द्धारिद्र्यनाश, पांढरे कोड नाहीसे करणे, आनंदप्राप्ती, राष्ट्राचा विकास यासारख्या विविध विषयांवरील सूक्ते या काण्डात आढळतात.

(१) मेधाजनन– बुद्धीला तीव्रता आणण्यासाठी केलेल्या प्रार्थना या सूक्तात आहेत. वेदज्ञान आणि त्यांचा पूर्ण उपभोग पूर्णांशाने आपल्याला मिळावा आणि वाणीचा स्वामी ब्रह्मा व मनोकामना पूर्ण करणारा वसुपति यांनी आपल्याला अध्ययन केलेल्या

ज्ञानाचा विनियोग करण्याची बुद्धी द्यावी, अशातऱ्हेची प्रार्थना यात आढळते.

(२) रोगोपशनम्– यात आमचे रोग, शस्त्रांचा आघात, रक्तस्त्राव, शत्रूंपासून होणारा त्रास नाहीसा करावा, अशातऱ्हेच्या प्रार्थना आहेत.

(३) मूत्रमोचन– या सूक्तात पर्जन्य, मित्र, वरूण, चंद्र, सूर्य, वसु ह्या बलयुक्त व पित्यासमान असणाऱ्यांनी आमच्या शरीरातील मूत्रादि रोगांना दूर करावे आणि या शरीरात साचून राहिलेले मूत्र बाहेर टाकून द्यावे, अशा प्रार्थना केलेल्या आहेत.

(४-५-६) पाणी हे रोगघ्न व आरोग्यदायक आहे. पाण्याच्या सिंचनाने रोगनिवारण व शांतिलाभ होतो. याकरिता काही ऋचा पठणासाठी दिलेल्या आहेत. त्याचबरोबर दिव्य व गुणसंपन्न, तसेच सर्व औषधींच्या रसाचे भांडार व आनंद प्रदान करणारे असे पाणी ईश्वरप्राप्तीच्या मार्गात आम्हाला सहाय्यभूत होवो, कारण औषधीयुक्त व अंतिम कल्याण करणारे पाणीच आहे, अशातऱ्हेच्या प्रार्थना केलेल्या आहेत.

(७-८) राक्षसांचा नाश करण्यासाठी केलेल्या प्रार्थना आहेत.

(९) या सूक्तात विजयासाठी तेजरूप व प्रज्ञावंत अग्नीला प्रार्थना केलेल्या आहेत. तसेच, यजमानाला तू दुःखमुक्त करून स्वर्गात घेऊन जा, अशी विनंती केलेली आहे.

(१०) पाशविमोचन, म्हणजे बंधनातून मुक्तता होण्यासाठी वरूणदेवतेकडे प्रार्थना केलेल्या आहेत व आम्ही तुला प्रदान केलेल्या हविरन्नाने प्रसन्न होऊन तू आमची अपराधापासून सुटका कर, अशी विनंती केलेली आहे.

(११) प्रसूती सुखमय होण्यासाठी कोणत्या ऋचा म्हणाव्यात व कोणत्या क्रिया कराव्यात याचे स्पष्टीकरण या सूक्तात आहे. तत्पूर्वी हा विधी करणाऱ्याने स्नानादि कर्मे करून शुद्ध व्हावे व गायत्री मंत्र म्हणून पाणी अगर भस्म हाती घेऊन, मग वरील प्रयोग करावा, अशी सूचना केलेली आहे. शिवाय दहाव्या महिन्यात पदार्पण केलेला हा गर्भ गर्भवेष्टनासह बाहेर येवो व बाहेर येताच त्याचे गर्भवेष्टन बाजूला होवो, अशी प्रार्थना केलेली आहे.

(१२) सूर्य हा प्राण्यांचे त्रिदोषोत्पन्न रोग दूर करून त्यांना सुख प्रदान करतो, म्हणून आमच्या अंगात प्रवेश केलेल्या पर्जन्य जलाने निर्माण होणारा कफ, वायूच्या योगाने उत्पन्न होणारा वात आणि पित्तादि विकृतींमुळे येणारा ताप, तसेच क्षयरोग सूर्याच्या दीप्तीने नाहीसा होतो. म्हणून माझ्या चारही अंगांमध्ये मुरलेले रोग नाहीसे होऊन मला सुख लाभो, अशातऱ्हेच्या प्रार्थना या सूक्तात आढळतात.

(१३) यामध्ये विद्युत्, म्हणजे वीज आणि

(१४) यामध्ये कुलाचे हित करणारी स्त्री यांची स्तुती करून सुख प्रदान करण्यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

(१५) यात सांसारिक विकासकार्यासाठी केलेल्या प्रार्थना आहेत. तसेच, देवांना, यज्ञातील हवि त्यांनी स्वीकारावेत म्हणून आवाहन केलेले आहे आणि यज्ञकर्त्या यजमानाला संतती, पशु व अन्य सर्वप्रकारचे धन देऊन ऐश्वर्यवंत करावे, तसेच आम्हाला गाई, धन, धान्य प्राप्त होवो, अशाप्रकारच्या प्रार्थना केलेल्या आहेत.

(१६) शत्रूबाधेपासून संरक्षण करण्यासाठी केलेल्या प्रार्थना यात आहेत. या सूक्तात आढळणारा 'सीस' शब्द शिसे याअर्थी केवळ नसून शिशाची गोळी याअर्थी आहे. या गोळीला वेग दिल्यास ती ज्या ठिकाणी आढळते त्या ठिकाणी पसरट होऊन अधिक हानी पोहोचवते. उदाहरणार्थ : बंदुकीच्या गोळ्या. याचा अर्थ वेदकाळींही अशा गोळ्या सोडणारे एखादे यंत्र असावे. देवतांनी इंद्राला व इंद्रदेवाने वरूणास दिलेले हे शिसे राक्षसांचा संहार करणारे आहे, असे या सूक्तात सविस्तर सांगितलेले आहे.

(१७) या सूक्तात रक्ताचा स्त्राव होऊ नये म्हणून धमनी बांधून रक्त थांबवणे या क्रियेसाठी म्हणावयाच्या ऋचा दिलेल्या आहेत. ज्या ठिकाणाहून रक्तस्त्राव होत असेल त्या ठिकाणापासून हृदयाच्या बाजूला चार बोटे, धमनीवर पाण्यात भिजवलेला अंगठा दाबून ठेवून मग त्या ऋचा म्हणाव्यात, असे सांगितलेले आहे व जखमी माणसास सुख प्रदान होवो यासाठी धमन्यांना विनंती केलेली आहे.

(१८) दारिद्र्यनाशासाठी व

(१९-२०-२१) शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी, सोम तसेच, प्रजास्वामी, अविनाशी इंद्राची व वरूणाची विविध प्रकारे प्रार्थना केलेली आहे.

(२२) हृद्रोगनाशासाठी, हृद्रोगाने व्याप्त झालेल्या व्यक्तीने करावयाच्या प्रयोगाची सविस्तर माहिती या सूक्तात दिलेली आढळते. सांगितलेला प्रयोग करून म्हणावयाच्या ऋचाही दिलेल्या आहेत.

(२३-२४) पांढरे कोड नाहीसे व्हावे यासाठी केलेल्या प्रार्थना या सूक्तात आहेत. हळद, रामभंगर आणि इंद्रवारूणि ह्या रात्रीच्या वेळी पुष्ट होणाऱ्या वनस्पती औषधींनी कुष्ठरोगाने विकृत झालेले अंग आपल्या अंगासारखेच पूर्ववत करोत व त्या पांढऱ्या डागांचा स्पर्शही शरीरास पुन्हा न होवो, अशा प्रार्थना केलेल्या आहेत.

(२५) या सूक्तात ज्वरनाशनासाठी

(२६) यात आनंदप्राप्तीसाठी

(२७) शुभनिवासलाभासाठी

(२८) राक्षसी बुद्धीच्या लोकांचा नाश करण्यासाठी

(२९) राष्ट्रसंवर्धनासाठी

(३०) दीर्घायुष्याचा लाभ होण्यासाठी

(३१) पाशमोचनासाठी (बंधमुक्ततेसाठी)

(३२) ब्रह्मस्वरूपाच्या गौरवासाठी विविध प्रार्थना केलेल्या आहेत.

(३३) पाणी व

(३४) मधुररसयुक्त लता (वेल) यांचे वर्णन करून, त्यांना गौरवून सुखमय जीवनासाठी इच्छा प्रगट केलेल्या आहेत.

(३५) या शेवटच्या सूक्तातही दीर्घ आयुष्याच्या लाभासाठी ३० व्या सूक्ताप्रमाणेच इच्छा व्यक्त करून पुरुषास सामर्थ्य लाभण्यासाठी नीलमणियुक्त सुवर्ण धारण करण्यास सांगितलेले आहे आणि अन्य देवतांबरोबरच इंद्र व अग्नि यांनी आमच्या उणीवांवर न रागावता त्या

सुवर्णधारणाने प्राप्त होणारे फळ आम्हाला प्रदान करोत, अशी इच्छा व्यक्त केलेली आहे.

### द्वितीय काण्ड

या काण्डात ३६ सूक्ते असून ऋचांची संख्या २०७ आहे.

द्वितीय काण्डातील प्रथम सूक्तात सूर्यदेवतेची विविध प्रकारे स्तुती केलेली आहे. ब्रह्मज्ञ सूर्याच्या सामर्थ्याची, त्याच्या अलौकिकतेची स्तुती व अनेक प्रकारे त्याच्या विश्वव्यापकत्वाचा गौरव करून हा ब्रह्मज्ञ सूर्यच आमचा पालनकर्ता व पोषणकर्ता आहे, आम्हाला तोच जन्म देतो व तो स्वर्गादि लोकांचा ज्ञाता असून सर्व (सातही) लोकांचे ज्ञान त्याला आहे, अशातऱ्हेने त्याचे गुणवर्णन केलेले आहे.

२ऱ्या सूक्तात सूर्यदेवाला 'गंधर्व' या नावाने, तर त्याच्या दीप्तिशलाकांना 'अप्सरा' म्हणून संबोधिलेले आहे व त्यांना नमस्कारपूर्वक हवि अर्पण केलेला आहे.

३ऱ्या सूक्तात 'मुंज' नावाच्या व्याधी दूर करणाऱ्या सर्वात महत्त्वाच्या अशा औषधीचे वर्णन करून त्याचा अतिसार, अतिमूत्रस्त्राव किंवा रुधिरस्त्राव यास थांबविण्यासाठी किंवा नाहीसे करण्यासाठी कसा उपयोग होतो ते सविस्तरपणे सांगितलेले आहे. तसेच, त्याच्या मुळाखालची ओली माती पोटाच्या व्याधींकरिता किती उपयुक्त आहे याचेही वर्णन व कृती सांगितलेली आहे.

४-९-१३-२८-२९ ह्या सूक्तांत अग्निदेवतेस, अदिती मातेस आणि इतर अनेक देवतांस दीर्घायुष्याच्या लाभासाठी प्रार्थना केलेल्या आहेत. त्यांची विविध प्रकारे स्तुती करून गुण गाईलेले आहेत आणि त्यांचे महत्त्व वर्णिलेले आहे.

५व्या सूक्तात इंद्राच्या पराक्रमाची,

६व्या सूक्तात शत्रूनाशक अग्नीची,

७व्या सूक्तात शापनिवृत्तीसाठी विविध प्रकारे स्तुती करून मानवाच्या अंतिम कल्याणासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

८व्या सूक्तात क्षय व कुष्ठरोग निवारणासाठी,

१०व्या सूक्तात शरीरातील सर्व रोगांना मुक्ती देऊन पापमुक्त करावे यासाठी,

११व्या सूक्तात श्रेयप्राप्तीसाठी,

१४-१५ व्या सूक्तांत क्रूरकर्म करणारे व राक्षस यांच्या नाशासाठी, तसेच भीतीचे निर्मूलन होण्यासाठी,

१६ व १७ व्या सूक्तांत संरक्षण व सामर्थ्य यांच्या लाभासाठी त्या त्या देवतांची अनेक प्रकारे स्तुती करून विविध मागण्या केलेल्या आहेत.

२५व्या सूक्तात **'पृश्निपर्णी'** या फुरशाच्या विषावर अत्यंत उपयुक्त असणाऱ्या औषधी वनस्पतीची स्तुती करून तिचे कार्य वर्णन केलेले आहे.

२६व्या सूक्तात पशूंच्या पोषण-वर्धनासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

३०व्या सूक्तात स्त्रीला वश करण्यासाठी केलेली प्रार्थना आहे.

३१ व ३२ ह्या सूक्तांत दृष्य व अदृष्य देहात वास करणाऱ्या जंतूंच्या उत्पत्तीचे निराकरण आणि जंतूनाश यावर उपाय म्हणून मंत्र सांगितलेले आहेत.

३३ व ३४व्या सूक्तात क्षयनाशासाठी मंत्रप्रभाव सांगितलेला आहे व पशुसाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

१८-१९-२०-२१-२२-२३-२४-२७ यांत शत्रूच्या नाशासाठी अग्नि, वायू, सूर्य तेज इत्यादी विविध देवतांच्या स्तुती करून प्रार्थना केलेल्या आहेत.

३५व्या सूक्तात विश्वोत्पत्तीकारक देव विश्वकर्म्यास आळवलेले आहे. त्याने पूर्ण कृपादृष्टी ठेवावी, अशी इच्छा व्यक्त केलेली आहे.

३६व्या सूक्तात वधूला इच्छित वराची प्राप्ती होवो, सूर्य त्या योग्य वरास त्या वधूच्या समीप आणो व त्याला तिच्याशी विवाहबद्ध होण्याची इच्छा प्राप्त होवो, अशातऱ्हेची प्रार्थना अग्नीला उद्देश्यून केलेली आहे.

### तृतीय काण्ड

या काण्डात ३१ सूक्ते असून ऋचांची संख्या २३० आहे.

तृतीय काण्डामध्ये पहिल्या २ सूक्तांत, तसेच ६ व्या सूक्तात शत्रूच्या सेनेला मोहित अथवा भ्रमित करून इंद्रदेवाने आपल्या वज्राच्या सहाय्याने भस्म करून टाकावे यासाठी इंद्रदेवतेस विविध प्रार्थना केलेल्या आहेत. इतकेच नव्हे, तर शत्रूसेनेला संमोहित करून अग्निदेव त्यांच्या नेत्रांना विकृत करो, त्यायोगे शत्रूसेना भयभीत होऊन जाईल, तसेच त्यांची मती भ्रष्ट करो, त्यांचा नाश होवो, अशातऱ्हेच्या इच्छा व्यक्त केलेल्या आहेत.

२७व्या सूक्तात शत्रूनिवारणासाठी इंद्र, अग्नि, सर्प इत्यादी देवतांनी प्रसन्न व्हावे म्हणून केलेल्या प्रार्थना आहेत.

३ऱ्या व ४थ्या सूक्तांत शत्रूच्या ताब्यात गेलेले राज्य राजास प्राप्त होऊन त्याने पुन्हा गादीवर बसावे यासाठी विविध देवतांस प्रार्थना केलेल्या आहेत. इंद्र, अग्नि व विश्वदेव यांनी त्या राजास प्रजापालनाचे सामर्थ्य प्रदान करावे, अशी इच्छा व्यक्त केलेली आहे. तसेच, प्रजेकडून त्या राजाचे स्वागत व्हावे व राजाने शंभर वर्षेपर्यंत सुखाने राज्याचा उपभोग घ्यावा, अशीही इच्छा व्यक्त केलेली आहे. राजाच्या व पर्यायाने प्रजेच्या कल्याणासाठी विविध इच्छा व्यक्त केलेल्या आहेत.

५व्या सूक्तात राजाने इंद्र व वरूण यांच्या कृपेने व प्रेमाने लाभणारा पर्णमणि आयुष्य वाढण्यासाठी, तसेच चंद्रकांत मणि शत्रूचे सामर्थ्य कमी करण्यास मदत करतो, म्हणून त्याच्या लाभासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

७व्या सूक्तात क्षय व पंडुरोग यांच्या नाशावरचे कृष्णमृगाचे शिंग हे औषध सांगितलेले आहे व रुग्णाने त्यापासून मुक्त व्हावे यासाठी प्रार्थना केलेली आहे.

९व्या सूक्तात कफ, सांधेदुखी ह्या रोगांच्या नाशासाठी अरलू (टॅटू) नामक वृक्षाचे पिवळटसर धारण केले असता या रोगांचे शमन होते, असे सांगितलेले आहे.

१०व्या सूक्तात ऐश्वर्यप्राप्तीसाठी,

११व्या सूक्तात अकाली मृत्यूपासून सोडवून दीर्घायुष्यलाभासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

१२व्या सूक्तात घरबांधणी केल्यावरच्या सर्व सुखांसाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

१३व्या सूक्तात 'आप', म्हणजे

पाण्याच्या सामर्थ्याचे वर्णन केलेले आहे.

१४ व्या सूक्तात गाईंना रहाण्यासाठी गोठे समृद्ध व्हावेत म्हणून प्रार्थना केलेल्या आहेत.

१५ व्या सूक्तात व्यापारात लाभ होण्यासाठी,

तर १६ व्या सूक्तात कल्याणासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

१७ व्या व १८ व्या सूक्तांत अनुक्रमे शेतीची भरभराट व्हावी म्हणून व वनस्पतीची, तिच्या सामर्थ्याची स्तुती करून विविध इच्छा व्यक्त केलेल्या आहेत.

१९ व्या सूक्तात अविनाशी सामर्थ्यासाठी,

२० व्या सूक्तात ऐश्वर्यवृद्धीसाठी,

२१ व्या सूक्तात शांतिलाभासाठी,

२२ व्या सूक्तात सत्तालाभासाठी,

२३ व्या सूक्तात वीरबालकांना जन्म देण्यासाठी,

२४ व्या सूक्तात समृद्धीसाठी,

२५ व्या सूक्तात स्त्रीच्या मनातील कामज्ञान नष्ट करून ती सर्वकार्यकुशल होऊन वश होण्यासाठी,

२६ व्या सूक्तात आत्मसंरक्षणासाठी विविध देवतांना आळवून, त्यांची स्तुती करून विविध प्रार्थना लाभासाठी केलेल्या आहेत.

२८ व्या सूक्तात पशुंचा सांभाळ व्हावा म्हणून प्रार्थना केलेल्या आहेत.

३१ व्या सूक्तात क्षयरोग झालेल्याचा क्षयरोग दूर करून त्याला दीर्घायुषी करावे यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

### चतुर्थ काण्ड

या काण्डात एकूण ४० सूक्ते आहेत. मंत्रसंख्या ३२४ आहे.

यात ब्रह्मज्ञान, आत्मज्ञान प्राप्त करून देणाऱ्या विविध देवतांची स्तुती करून त्यांचे सामर्थ्य वर्णन केलेले आहे. शत्रूनाश व्हावा, विषनाश व्हावा, राजा पुन्हा राज्यावर प्रस्थापित व्हावा, रोगापासून संरक्षण व्हावे, तेजसंपन्नता प्राप्त व्हावी यासाठी प्रारंभीच्या सूक्तांत विविध प्रार्थना केलेल्या आहेत.

तसेच २० व्या सूक्तात पिशाचनाशासाठी,

२१ ते २९ व्या सूक्तांत पापापासून मुक्तता करण्यासाठी,

३५ व्या सूक्तात मृत्यूला मागे टाकण्यासाठी, थोडक्यात अमर होण्यासाठी विविध देवतांकडे इच्छा प्रगट केलेल्या आहेत.

यातील कित्येक सूक्ते विविध विषयसंपन्न अशी आहेत. उदाहरणार्थ: सूक्त ४ मध्ये सूर्य सर्वश्रेष्ठ असा वीर्यसंपन्न असून मंत्राच्या योगे आणि औषधींच्या योगे सर्व पुरुष वीर्यसंपन्न होवोत, अशातऱ्हेच्या इच्छा व्यक्त केलेल्या आहेत. तसेच, हे वीर्यवान पुरुष निरोगी राहोत यासाठी अग्नि, सूर्य, सरस्वती व ब्रह्मणस्पति यांस आळवलेले आहे.

५ व्या सूक्तात वायूदेवतेची स्तुती करून तू तुझ्या मंद चालीने, सर्प, कुत्रे आणि स्त्रिया यांना निद्रावश कर, तसेच ज्या स्त्रीला आम्ही वश करू इच्छितो त्या स्त्रीचे माता-पिता, रक्षक वगैरे निद्राधीन होवोत, अशातऱ्हेच्या प्रार्थना केलेल्या आहेत.

६ व्या व ७ व्या सूक्तांत विषनाशासाठी केलेल्या प्रार्थना आहेत.

९ व्या सूक्तात अंजनाची (काजळाची),

१० व्या सूक्तात शंखाची,

११ व्या सूक्तात वृषभाची,

१२ व्या सूक्तात रोहणी वृक्षाची (या वनस्पतीचा उपयोग विषमज्वरात, तसेच कोणतीही जखम भरून येण्यासाठी, रक्तस्राव थांबविण्यासाठी आणि रक्तप्रवाहाचे नियमन व वेदना शमन करण्यासाठी करतात. त्याचे इतरही उपयोग या औषधीचा मंत्रासह उपयोग केल्यास होऊ शकतात.) स्तुती करून विविध प्रार्थना केलेल्या आहेत.

१३ व्या सूक्तात रोगापासून संरक्षण व्हावे म्हणून,

१४ व्या सूक्तात तेजसंपन्नतेसाठी,

१५ व्या सूक्तात पर्जन्यवृष्टी होऊन प्रत्येक प्राणिमात्रास तृप्त करण्यासाठी,

२१ व्या सूक्तात गाईंची स्तुती करून त्यांच्यावर पूर्ण कृपादृष्टी ठेवण्यासाठी विविध देवतांना प्रार्थना केलेल्या आहेत.

तसेच, बलवान मन्युदेवाने सेनेचा प्रमुख होऊन, युद्धात उपस्थित राहून शत्रूला नष्ट करावे आणि त्यांचे धन आम्हाला वाटून टाकावे, अशी इच्छा ३१ व्या सूक्तात व्यक्त केलेली आहे.

३२ व्या सूक्तातही मन्युदेवाची स्तुती करून बल प्रदान करण्यासाठी प्रार्थना केलेली आहे.

३७ व्या सूक्तात कीटक-किड्यांचा नाश करणाऱ्या निरनिराळ्या वनस्पतींच्या सामर्थ्याचे वर्णन केलेले आहे. त्यांचे विविध उपयोग सांगितलेले आहेत.

१७, १८ व १९ मध्ये अपामार्ग (आघाडा) या वनस्पतीचे वर्णन करून तिचे औषधी उपयोग सांगितलेले आहेत. या वनस्पतीचे पान हृदयाच्या आकाराचे असून याचे मूळ, खोड, पान, फूल व फळ औषधात उपयुक्त असते, तसेच ही विषद्रव्यनाशिनी आहे, दुसऱ्यांचे दुःख दूर करणारी, पिशाच्चांना मूर्च्छित करणारी, मानवांना रोगशून्य करून चिरंतन करणारी, शत्रूपासून संरक्षण करणारी, वाईट कृत्यांपासून संरक्षण करणारी, फल देणारी, राक्षदिकांपासून संरक्षण करणारी, अशी ही वनस्पती औषधांची स्वामिनी म्हणून अथर्ववेदात मानली गेली आहे.

३९ व्या सूक्तात संतती-माहात्म्य वर्णन केलेले आहे. पृथ्वी ही गाय असून अग्नि तिचे पाडस आहे. वायू हा अंतरिक्षाचा स्वामी असून अंतरिक्षात रहाणारे गंधर्व वायूच्या जवळ आल्याने वायूला ज्याप्रमाणे समृद्धी प्राप्त होते त्याप्रमाणे आम्हालाही होवो. वर सांगितल्याप्रमाणे पृथ्वी आपल्या 'अग्नि'रूपी वत्सामार्फत मनुष्याला अन्न, पशुधन व शंभर वर्षांचे आयुष्य प्रदान करते, तर वायू मनुष्याला अन्न, पशु, शतायुष आणि इच्छित वस्तू प्रदान करतो. सूर्य हे आकाशाचे वत्स आहे. सर्व दिशा ही गाय असून चंद्र हे तिचे वत्स आहे, असे सांगून ह्या वत्सांच्या सामर्थ्याचे वर्णन केलेले आहे.

### पंचम काण्ड

यात ३१ सूक्ते असून मंत्रसंख्या ३७६ आहे.

पंचम काण्डातील १ ते ८ सूक्तांत अनुक्रमे अमरत्वासाठी (यात चोरी, गुरुपत्नीगमन, ब्रह्महत्या, भ्रूणहत्या, मद्यपान, द्यूत आणि

मिथ्या भाषण यांचे आचरण करणारा 'पापी' होय, असे स्पष्टपणे सांगितलेले आहे.), सर्वात ज्येष्ठ पुरुष, म्हणजेच सकलांचा स्वामी व राजासाठी, विजयप्राप्तीसाठी (या प्रार्थनेचा उपयोग संकटाच्या वेळी एकटे असताना किंवा ज्या ठिकाणी काही सुचेनासे होते त्या ठिकाणी करतात.), कुष्ठरोगनाशासाठी, लाखेच्या संरक्षणासाठी (कारण लाख बलसंपन्न आहे.), ब्रह्मज्ञानप्राप्तीसाठी, शत्रूनाशासाठी, त्याला नष्ट करण्यासाठी विविध देवतांना प्रार्थना केलेल्या आहेत.

११ व्या सूक्तात संपत्तीलाभासाठी करावयाची सूर्य किंवा वरूणाची स्तुती,

१३ व्या सूक्तात सर्पविषबाधेपासून मुक्त होण्यासाठीच्या सर्व ऋचा, म्हणजे महान ग्रंथच आहे (अनोळखी ठिकाणी, विशेषत: अरण्य, जलाशय, गुहा, पर्वत ह्या ठिकाणी जाताना ह्या मंत्रांचा उपयोग केल्याने ती स्थळे भीतीशून्य होतात.) व त्याविषयीचे सविस्तर वर्णन आहे.

१४ व्या सूक्तात कृत्याच्या वाईट गतीला रोखणारे मंत्र वर्णन केलेले आहेत. याशिवाय या काण्डात आत्मा, आत्मरक्षा, रोगोपशमन, वृषभरोगशमन, ब्राह्मण पत्नी, ब्राह्मणवर्चस्व, शत्रूनाश, सर्व दु:खांचा व रोगांचा परिहार करणे, कृमिनाश, ब्रह्मकर्म (यात मानवाचे रक्षण व्हावे आणि विविध आचारात साथ लाभावी म्हणून केलेली प्रार्थना आणि समर्पित केलेली आहुती यांचा सुदंर मिलाफ आहे. ह्या ऋचांचा पाठ कित्येक ठिकाणी केला जातो.), गर्भप्रतिष्ठा (गर्भ प्रस्थापित करणे), नवीन घरात होम करून घृताहुति देणे, प्रदीर्घ आयुष्य-प्राप्ती, राक्षसांचा संहार, दीर्घ आयुष्य-लाभ इत्यादी विविध विषयांवरील सूक्ते एकत्र आढळतात.

सूक्त २४ ब्रह्मकर्म यामधील एकूण १७ ही ऋचा मानवी जीवनाला सुखदायक अशाच आहेत.

### षष्ठ काण्ड

या काण्डामध्ये एकूण १४२ सूक्ते आहेत व मंत्रसंख्या ४५४ आहे.

यात विविध देवतांची स्तुती करून आत्मरक्षण, उत्तम पदाचा लाभ, शत्रूनाश, कामनापूर्ती (हा वशीकरण मंत्र असून या मंत्राचा उपयोग स्त्री, गाय, हरिणी वगैरे आपल्या अंकित रहाण्यासाठी केला जातो.), पुरुषबीजाचे संजीवन करणे, सर्पविषाचे निवारण करणे, मृत्यूवर विजय मिळवणे (१३ व्या सूक्तात मृत्यूची ही एक उत्तम प्रार्थना आहे. अत्यंत तीव्र वेदना व रोग या प्रार्थनेने शमतात.), बलाचा नाश होणे, नेत्रांचे संरक्षण (१६ व्या सूक्तात रोग नष्ट करण्यासाठी करम्भ भक्षण केला जातो, असे सांगून ऐलब, बभ्रू आणि निराल नामक नेत्ररोग या शरीरातून निघून जावोत, अशी इच्छा व्यक्त केलेली आहे.), गर्भ विकसीत होणे (१७ व्या सूक्तात स्त्रीने विशाल पृथ्वी ज्याप्रमाणे सर्व वस्तूंचा गर्भ धारण करते त्याप्रमाणे प्रसवकाळपर्यंत सर्व अवयवयुक्त गर्भ धारण करावा, अशी इच्छा प्रगट केलेली आहे.), मत्सराचा नाश, क्षयनाश, पाण्यापासून निरोगीकरण, विकृतिनाश, पापी वृत्तीचा नाश, अरिष्टनाश, निर्भयताप्राप्ती, रोगशमन, दु:खद स्वप्नांचा नाश, भीतीनाश, सर्व बाजूंनी संरक्षण, संततीलाभ, वर्चस्वलाभ, प्रतिष्ठापना, उत्साह, बलप्राप्ती, प्रेमवृद्धी, बाणाचे निराकरण, युद्धात जय, बुद्धीवर्धन, विश्वावर जय मिळवणे, उन्मत्तता नाहीशी करणे, पापमुक्ती, कर्जमुक्ती, उत्तम गति, ऐश्वर्यप्राप्ती, केशवर्धन, शत्रूस नपुंसकत्व, सौभाग्यवृद्धी, गोपालन, अन्नसमृद्धी, यातुधानक्षय (मानवांना त्रास देणारे किडे किंवा जंतु यांचा क्षय), पतिलाभ (पतिलाभासाठी उपवर कन्येच्या पित्याने अथवा तिने स्वत: ६० व्या सूक्तातील ३ ऋचांचा मंत्र सूर्याच्या साक्षीने म्हटल्यास इच्छित वरप्राप्ती होते.) (नवदाम्पत्यास सुखमय व समृद्धीमय जीवन लाभावे म्हणून ७८ व्या सूक्तात प्रार्थना सांगितलेली आहे.), अशा अनेक आणि विविध विषयांवरील अर्थपूर्ण ऋचा समाविष्ट आहेत.

### सप्तम काण्ड

या काण्डात ११८ सूक्ते आहेत व ऋचांची संख्या २८६ आहे.

प्रथम तीन सूक्तांत आत्म्याची, पर्यायाने प्रजापति इंद्राची स्तुती करून त्याचे कार्य वर्णन केलेले आहे. तो मातृगर्भ, पित्याचे वीर्य, नित्य तरूण, देवबंधु या नात्याने रक्षण करतो, तसेच तो कर्माचे फल प्रदान करणारा, आदरणीय, सर्वांच्या अंतरात असलेला, यज्ञादि कर्माची प्रेरणा देणारा, आपले माता-पिता, प्रकृति, द्युलोक आणि पृथ्वी यांचा ज्ञाता आहे. त्याने पृथ्वी, अंतरिक्ष आणि आकाश व्यापलेले आहे. याशिवाय विश्वप्राण, आदिति (पृथ्वी), आदित्य, सरस्वती, विद्युत् (वीज), सवितृ (सूर्यदेवता), पर्जन्यासाठी पृथ्वीदेवता, ज्योत, विष्णुदेवता, समृद्धीसाठी समृद्धीदेवता, कल्याणासाठी दर्माची, प्रदीर्घ आयुष्यासाठी अग्नि, मरूत, पूषा (पोषणदेवता), ब्रह्मणस्पति ह्या देवता, अग्नि आणि विष्णुदेवता, तसेच, पाणी (जलदेवता), पर्णवान वनस्पती, वाक्‌देवता, सिनीवालीदेवता (ही सर्व देवतांची भगिनी असून अमावास्येची अधिष्ठात्री आहे, असे मानतात.), राका (ही देवता कल्याणमय आणि उत्तम बुध्दीयुक्त धन प्रदान करो, अशी इच्छा सूक्त ४८ मध्ये व्यक्त केलेली आहे. पूर्णचंद्रयुक्त पौर्णिमेला राका म्हणतात.), संरक्षणासाठी बृहस्पति आणि इंद्रदेवता, गोदेवता, तसेच अमावास्या, पौर्णिमा, सूर्य, चंद्र, गरूड, आहुति, यज्ञवेदी, क्षत्रिय, राष्ट्रीयता इत्यादी अनेक विषयांवर विविध देवतांना उद्देश्यून केलेल्या प्रार्थना आढळतात आणि जगत्कल्याणाकरिता प्रथम त्या त्या देवतांची स्तुती करून त्यांचे कार्यवर्णनही सविस्तरपणें केलेले दिसून येते. शत्रूचा नाश करण्यासाठी, तसेच पापाचा नाश होण्यासाठी बऱ्याच प्रार्थना या काण्डात आढळतात.

१० व्या सूक्तातील सरस्वती, म्हणजेच विद्यादेवतेची ऋचा ऋग्वेदातही आढळते. नवजात बालकाला प्रथम दुग्धपान देताना म्हणावयाचा मंत्र यात आहे.

१९ व्या सूक्तामध्ये पुत्रादि संततीसाठी व संततीच्या समृद्ध आचारासाठी (विवेकपूर्ण आचार) केलेली उत्तम प्रार्थना आहे.

५२ व्या सूक्तात महान समारंभ, यज्ञ, परिषदा, वादसभा यांच्या सांगतासमयी ही प्रार्थना करण्याचा प्रघात असे.

५६ व्या सूक्तात विषावरील औषधीविषयी माहिती मिळते. तिरश्च, काळसर्प, नाग व कंकपर्व ह्या सर्पांचे विष मधुक नावाची औषधी दूर करते. ही औषधी मधामुळे उत्पन्न होते. मधुक, म्हणजे ज्येष्ठमध किंवा

मोहाडा यांचा विषावर वमन प्रयोग करण्यात येतो. (मोहाडापासून मद्य तयार करतात.)

६९ वे सूक्त ही एक उत्तम प्रार्थना आहे. वाहणारा वारा, तळपणारा सूर्य, दिवस, रात्र आणि उषा आमच्यासाठी कल्याणकारक होवो, अशी सुख व कल्याणप्राप्तीसाठी केलेली प्रार्थना आहे.

८६ वे सूक्त ही एक इंद्राची उत्तम प्रार्थना आहे. (या ऋचेच्या उच्चाराबरोबर यज्ञसमयी अग्नीला आहुति प्रदान करून अभीष्ट प्रार्थितात.)

वरील प्रार्थनांशिवाय प्रसन्नतेसाठी प्रार्थना, अनुकूलतेसाठी प्रार्थना, दु:खद स्वप्नांचा नाश होण्यासाठी, तसेच केवळ पतीसाठी केलेली प्रार्थना, ईर्ष्या वा राग निवारण होण्यासाठी आणि सन्मार्ग दर्शनासाठी केलेली प्रार्थना, सर्व समृद्धीने युक्त अशा घरासाठी व ज्वरनाशासाठी केलेली प्रार्थना, अशा अनेक विषयांवरील प्रार्थना या सूक्तात आढळतात.

११८ व्या सूक्तात मर्मस्थानाचे ज्ञान करून घेण्यासाठी, तसेच इंद्र व वरूणदेवतेकडे विजयप्राप्ती व महान सुख प्रदान करावे यासाठी केलेल्या प्रार्थना आहेत.

सूक्त ७४ व ७६ मध्ये गंडमाला चिकित्सेबद्दल माहिती आलेली आहे. गंडमाला पूयुक्त झाल्यास पीडा देतात, परंतु औषधींचा मंत्रासहित उपयोग केल्यास त्या बऱ्या होतात.

**अष्टम खण्ड**

या खण्डात केवळ १० सूक्ते आहेत, परंतु ऋचांची संख्या वरील सर्व खण्डांतील सूक्तांपेक्षा जास्त, म्हणजे २९३ आहे.

सूक्त १ व २ मध्ये दीर्घायुष्यप्राप्तीसाठी,

सूक्त ३ व ४ मध्ये अनुक्रमे शत्रूचा नाश करण्यासाठी व शत्रूला दंड देणे किंवा त्यांचा संहार करण्यासाठी विविध प्रार्थना केलेल्या आढळतात.

पाचव्या सूक्तात प्रतिकारक मणि किंवा रत्नाचे सामर्थ्य वर्णन केलेले आहे. हा मणि वीर्यशाली, बलदायक, सर्वरक्षक, संतान प्रदान करणारा, संपत्ती वृद्धिंगत करणारा, शत्रूवर विजय मिळविणारा, रोगप्रतिकारक, मंगलता निर्माण करणारा असा आहे, असे सांगितलेले आहे.

६ व्या सूक्तात गर्भदोष नाहीसे होण्याकरिता केलेल्या प्रार्थना आहेत.

७ व्या व ८ व्या सूक्तांत अनुक्रमे औषधी व शत्रूचा पराजय किंवा त्याचे निर्दालन होण्यासाठी केलेल्या प्रार्थना समाविष्ट आहेत.

९ व्या व १० व्या सूक्तांत विराटाचे किंवा भव्यतेचे वर्णन, तसेच त्याच्या सामर्थ्याचेही वर्णन फार सुंदररीतीने केलेले आहे.

**नवम काण्ड**

या काण्डामध्येही १० सूक्ते असून एकूण ऋचांची संख्या ३१३ आहे.

प्रथम सूक्तात कल्याणकारी ज्ञानप्राप्तीसाठी,

तसेच २ऱ्या सूक्तात काम (इच्छा) देवाकडे शत्रूंच्या संहारासाठीं आणि शरीरात प्रविष्ट असणाऱ्या पापबुद्धीला घालविण्यासाठी देवतांना विविध प्रार्थना केलेल्या आहेत.

तिसऱ्या सूक्तात बलोत्पादक, धान्योत्पादक, अन्नसमृद्ध आणि आश्रयदाती अशी शाला (शाळा-घर) हिचे सामर्थ्य वर्णन करून प्रार्थना केलेल्या आहेत.

४ थ्या सूक्तात 'वृषभ' (बैल) याच्या श्रेष्ठत्वाचे वर्णन करून प्रार्थना केलेली आहे. हा बैल वीर्य, शक्ती, पौरुष आणि अग्नियुक्त, रक्षणशील, घृत प्रदान करणारा आणि इंद्ररूप धारण करणारा आहे, असे सांगितलेले आहे.

५ व्या सूक्तात पंचौदन अज (पंचकल्याणी बकऱ्याची) याची स्तुती करून त्याची महती गाईलेली आहे. व्यावहारिक सत्य, पारमार्थिक सत्य, दृष्टी, शिर, प्राण, श्रद्धा, विश्वावर असलेली दृढ श्रद्धा हा अपरिमित यज्ञ, म्हणजे पंचौदन अज आहे. अशा अजाच्या दानाने दाता महान लोकाची प्राप्ती करतो.

६ व्या सूक्तात अतिथीच्या आदराचे महत्त्व वर्णन केलेले आहे. अतिथीपती यज्ञामध्ये यजमान ब्राह्मण असून तो सर्व जाणणारा आहे. अतिथीला अन्न देणारा पवित्र यज्ञकर्ता होतो. अतिथीच्या पूर्वी भोजन करणारा आपल्या अभिष्ट कर्मांचा नाश करून घेतो, आपल्या घरातील समृद्धी, प्रजा, पशुधन, गृहयज्ञ, घरची लक्ष्मी, समान बुद्धी यांचा स्वत: नाश करतो. म्हणून अतिथीच्या अगोदर भोजन करू नये, हा गृहस्थाचार प्रत्येकाने पाळावा. त्याने यावेळी गोदुग्ध व आमिष यांचे सेवन करू नये. अतिथीच्या सेवेमुळे अग्निष्टोम यज्ञाचे फळ प्राप्त होते, तो स्वर्गप्राप्ती करून घेतो आणि अतिथीला विविध भोजन-पदार्थ व दक्षिणा देऊन पवित्र होतो. इत्यादी विविध प्रकारे अतिथी-आदराचे श्रेष्ठत्व आणि महत्त्व फार सुंदररीतीने सविस्तर पटवून दिलेले आहे.

सूक्त ७ मध्ये 'गौ', म्हणजे गाईचे वर्णन करून हे संपूर्ण विश्व गोरूप कसे आहे, हे दाखवून दिलेले आहे.

८ वे सूक्त हे क्षयरोगनिवारणासंबंधी असून

९ वे व १० वे सूक्त हे आत्म्यासंबंधी विवेचन करणारे आहे.

**दशम काण्ड**

या काण्डात १० सूक्ते असून एकूण ऋचांची संख्या ३५० आहे.

पहिल्या १ ते ४ सूक्तांत अनुक्रमे अभिचार कर्म करणाऱ्या स्त्रीचा तिरस्कार, ब्रह्माचे प्रगट दर्शन, शत्रूनाशक रत्न, विष दूर करणे, ह्या गोष्टी आलेल्या आहेत, तर ५ व्या सूक्तात जल किंवा उदकाच्या सामर्थ्याचे व विजयप्राप्तीचे वर्णन करून विविध मागण्या केलेल्या आहेत.

६ व्या सूक्तात मनगटात बांधावयाच्या सुवर्णमय रत्नजडित सूत्राची महती गाऊन विविध प्रार्थना केलेल्या आहेत.

८ व्या सूक्तात परब्रह्माचे वर्णन,

९ व्या सूक्तात शतौदानी गौ, म्हणजेच शतकल्याणी गाईच्या सामर्थ्याचे वर्णन आणि

१० व्या सूक्तात स्त्रीरूपी गाईचे सामर्थ्य-वर्णन केलेले आहे.

**एकादश काण्ड**

एकादश काण्डामध्ये ९ सूक्ते असून एकूण ऋचांची संख्या ३१३ आहे.

या काण्डामध्ये ब्रह्मरूपी अन्नाची, रूद्रदेवतेची, ओदन, म्हणजे शिजवलेल्या अन्नाची, प्राण (सचेतनता), तसेच ब्रह्मचर्याची स्तुती करून त्यांचा महिमा गाईलेला आहे आणि कल्याणासाठी प्रार्थनाही केलेल्या आहेत.

७ व्या सूक्तात यज्ञ पूर्ण झाल्यावर जे अन्न शिल्लक रहाते ते खाण्यासाठी उपयोगात आणीत असत. त्या अन्नास 'उच्छिष्ट' असे

म्हणतात. हे अन्नब्रह्म अत्यंत पवित्र व वेदमंत्रांमुळे समृद्ध झालेले असते. त्या अन्नाची महती सांगितलेली आहे. याशिवाय पापापासून मुक्तता व शत्रूसंहार होऊन यश देण्याबद्दलच्याही ऋचा या काण्डात आहेत.

## द्वादश काण्ड

या काण्डात ५ सूक्ते असून एकूण ३०४ ऋचा आहेत.

यातील प्रथम सूक्त हे भूमिसूक्त असून यात पृथ्वीची विविध प्रकारे स्तुती गाईलेली आहे. पृथ्वीच्या सामर्थ्याचे आणि वैभवाचे फार सुंदर वर्णन यात आढळते. ब्रह्म, तप, सत्य, दीक्षा आणि विपुल जल हे पृथ्वीचे वैभव आहे, असे सांगितलेले आहे. तिला औषधी उत्पन्न करणारी, संसार सजविणारी, ऐश्वर्यरूपा, धर्मरूपा, कल्याणमयी, निवासप्रदायिनी, इंद्राश्रिता, वेगवती, कंपनसंपन्ना, प्रियरूपा असे अनेक प्रकारे संबोधून शत्रूचा नाश करून कल्याणाकरिता अनेक प्रार्थना केलेल्या आहेत.

२ऱ्या सूक्तात अग्निदेवतेच्या अलौकिक सामर्थ्याचे वर्णन करून तिने शत्रूला खाऊन टाकावे (त्याचा नाश करावा), आम्हाला पापशुद्ध करून दीर्घायुषी करावे, प्राणिमात्रांचे रोग नाहीसे करून त्यांना शुद्ध करावे आणि आमच्या आराधनेने संतुष्ट होऊन प्रदीर्घ काळपर्यंत प्रदीप्त रहावे, अशा अनेक तऱ्हेच्या प्रार्थना केलेल्या आहेत.

तिसऱ्या सूक्तात स्वर्गाचे सौंदर्य-जीवन-घृतयुक्त ओदन हे अमृतरूप आहे, असे संबोधून हे ओदन यजमानाला स्वर्गफळ प्रदान करते, त्याला देवतांचे सान्निध्य लाभते, ओदनाची चवदेखील अमृतासारखी आहे, देवता कुशासनावर बसून या ओदनाचा आस्वाद घेतात, अशारीतीने अनेक प्रकारे ओदनाचे सामर्थ्य वर्णन करून त्याचा गौरव केलेला आहे.

४थ्या सूक्तात ऐश्वर्यरूपी गाईची (या गाईची जो कोणी सेवा करतो तो ब्रह्मज्ञ होतो, असे विद्वान म्हणतात.) व

५व्या सूक्तात ब्राह्मणाची गाय हिची स्तुती करून त्यांच्या सामर्थ्याचे वर्णन केलेले आहे. जो क्षत्रीय ब्राह्मणाच्या गाईंचे अपहरण करून त्यांचे आयुष्य क्षीण करतो त्या क्षत्रियाचे ओज, तेज, बल, वाणी, इंद्रिय, लक्ष्मी, धर्म, क्षात्रबल, राष्ट्र, दीप्ति, यश, सत्ता, धन, आयुष्य, रूप, नाव, कीर्ति, वायू, नेत्र, कान, दूध, रस, अन्न, अग्नि, ऋत, सत्य, इष्टपूर्त प्रजा यांचा संपूर्ण नाश होतो व ती गाय मृत्यूला कारणीभूत होते, असे सांगितलेले आहे.

## त्रयोदश काण्ड

या काण्डात चार सूक्ते असून १८८ ऋचा आहेत.

प्रथम सूक्तात सूर्यदेवतेची स्तुती गाऊन सूर्याच्या तेजाचे, बलाचे, त्याच्या महान आणि अलौकिक सामर्थ्याचे वर्णन केलेले आहे. सर्व प्राणिमात्रांचे कल्याण करणाऱ्या सूर्याजवळ विविध इच्छा प्रगट केलेल्या आहेत, तसेच अग्निदेवतेची आणि तिच्या पराक्रमाचीही स्तुती केलेली आहे. एकूणच या काण्डामध्ये सूर्याच्या सामर्थ्याचे भरभरून वर्णन केलेले आहे. ही सूर्यदेवता, म्हणजे एक अद्वितीय अशी महाप्रचंड शक्तीच आहे. याशिवाय इंद्राला केलेलीही प्रार्थना आहे.

## चतुर्दश काण्ड

या काण्डात २ सूक्ते असून मंत्रसंख्या १३९ आहे.

प्रथम सूक्तात सूर्यपुत्री सूर्या आणि आश्विनीकुमार यांच्या विवाह-सोहळ्याचे सविस्तर वर्णन, जे ऋग्वेद, मंडल १०, सूक्त ८५ मध्ये आलेले आहे. त्यावेळेस सूर्याची पाठवणी करताना तिला दिलेले सर्वोत्तम आशीर्वाद या वेदात वर्णनाबरोबर समाविष्ट केलेला आहे; तो थोडक्यात पुढीलप्रमाणे– तू गृहस्वामिनी होऊन पतीच्या घरी जा! सर्वांना आपलेसे कर! सदैव मधुर वाणी बोल! तुझ्या घरातील लोकांना सर्व बाजूंनी समृद्ध कर! तुम्ही उभयता एकत्र रहा! वेगळे होऊ नका! पतीची आवडती होशील, असे वाग! आयुष्यभर उत्तम पदार्थांचे सेवन करा! पुत्रपौत्रादिकांसमवेत खेळकर आणि मंगलमय वातावरणात रहा! सत्याचा आश्रय करणाऱ्या तुम्हा दोघांना सौभाग्य प्राप्त होवो! हे वधू, तू प्रजाधन ऐश्वर्य आणि प्रसन्नता यांची इच्छा करीत असतानाच पतिसमवेत, पतीला अनुकूल होऊन अमृतमय सुखाचा उपभोग घे आणि आपल्या पतीच्या अंगस्पर्शाने तू सौभाग्यवान हो! असे सांगून ती त्याप्रमाणे वागल्यास तिला आणखी कसे ऐश्वर्य प्राप्त होईल याचे वर्णन २ऱ्या सूक्तात करून अनेक सदिच्छा प्रगट केलेल्या आहेत व वधूला दिलेला मंगल आशीर्वादही यात आहे.

## पंचदश काण्ड

या काण्डात एकूण १८ सूक्ते व मंत्रसंख्या किंवा ऋचांची संख्या २३० आहे.

या संपूर्ण काण्डात व्रतधारी समूहपतीच्या अलौकिक आणि विश्वव्यापी सामर्थ्याचे अत्यंत सुंदर वर्णन केलेले आहे. या व्रतधारी समूहपतीने प्रजापतीला प्रेरणा दिली व त्यामुळे त्याला स्वत:च्या आत्म्याचे दर्शन होऊन जे सामर्थ्य प्राप्त झाले त्या सामर्थ्यानेच प्रजापतीने सर्वांना निर्माण केले; त्यामुळेच हा प्रजापती सर्व देवतांचा स्वामी म्हणून ओळखला जातो; कारण तो सर्वश्रेष्ठ, महान, सर्वांना आवडणारा, ब्रह्मवर्चस्वी, तपोधन आणि सत्यकर्मा असा आहे.

हा व्रतधारी समूहपती पूर्व दिशेकडे जाऊ लागल्यावर कल्मणी, श्रद्धा, पुंश्चली, मंत्र, विज्ञान, दिन, रात्र इत्यादी त्याची भूषणे बनली; मातरिश्वा, पवमान, रेष्मा, क्रीडा वायू, विपथवाह इत्यादी त्याचे सारथी झाले, कीर्ति आणि पुरोहित झाले, तर रेष्मा प्रतोद (चाबूक) बनली.

हा व्रतधारी दक्षिण दिशेस जाऊ लागल्यावर त्याच्यामागून यज्ञीय, यज्ञ, साम, यजमान, पशु, वामदेव्य चालू लागले. वरीलप्रमाणेच विज्ञान, वस्त्र, दिन, रात्र, उषा, पुंश्चली इत्यादी त्याची भूषणे झाली व पौर्णिमा, मातरिश्वा, पवमान, विपथवाह इत्यादी त्याचे सारथी झाले.

हा व्रतधारी पश्चिम दिशेस चालू लागल्यावर वस्त्र, विज्ञान, कल्मणी, दिन, रात्र इत्यादी त्याची भूषणे बनली, तर मातरिश्वा, पवमान, विपथवाह हे सारथी बनले. रेष्मा चाबूक बनली.

हा व्रतधारी उत्तर दिशेस जाऊ लागला तेव्हा सप्तऋषी, सोम, श्यैत आणि नौधस त्याच्यामागून जाऊ लागले. वरीलप्रमाणेच सर्व याची भूषणे व सारथी होतात; वात हा याचा सारथी होतो.

याचे ज्ञान असणारे, हे जाणणारे विद्वान कीर्ति व यशाचे स्वामी होतात.

(१) वसंत ऋतूचे मधु व माधव (चैत्र, वैशाख) ह्या दोन महिन्यांना देवतांनी पूर्व दिशेचे रक्षक म्हणून नियुक्त केले.

(२) ग्रीष्म ऋतूचे शुक्र व शुचि (ज्येष्ठ, आषाढ) ह्या दोन महिन्यांना देवतांनी दक्षिण दिशेचे रक्षक म्हणून नियुक्त केले.

(३) वर्षा ऋतूचे नभ आणि नभस्य (श्रावण, भाद्रपद) ह्या दोन महिन्यांना पश्चिम दिशेचे रक्षक केले.

(४) शरद ऋतूचे इष, ऊर्ज (आश्विन, कार्तिक) ह्या दोन महिन्यांना देवतांनी उत्तर दिशेचे रक्षक म्हणून नियुक्त केले.

(५) हेमंत ऋतूचे सह व सहस्य (मार्गशीर्ष, पौष) ह्या दोन महिन्यांना अधर दिशेचे रक्षक म्हणून देवतांनी नियुक्त केले आणि

(६) शिशिर ऋतूचे तप आणि तपस्य (माघ व फाल्गुन) ह्या दोन महिन्यांना देवतांनी उर्ध्व दिशेचे रक्षक म्हणून नियुक्त केले. ह्या सर्वांची जाण असणाऱ्याला त्या त्या दिशेकडून संरक्षण प्राप्त होते आणि त्या त्या महिन्यांकडून अनुकूलता प्राप्त होते, तसेच त्याला अनुक्रमे (१) साम (२) यज्ञायज्ञीय व वामदेव्य साम (३) वैरूप व वैराज हे साम (४) नौधस व श्यैत हे साम (५) पृथ्वी व अग्नि (६) सूर्य आणि आकाश अनुकूल होतात.

पूर्व दिशेच्या कोपऱ्यातून (आग्नेय) बाण सोडणाऱ्या भवाला देवतांनी त्याचे अनुष्ठान करायला लावले. त्यामुळे 'भव' पूर्व दिशेच्या लोकांना अनुकूल होतो. दक्षिण दिशेच्या कोपऱ्यातून (नैऋत्य) बाण संधान करणाऱ्या शर्वदेवतेला देवतांनी तिचे अनुष्ठान करायला लावले, त्यामुळे हे जाणणाऱ्या पुरुषाला 'शर्व' आग्नेय दिशेमध्ये अनुकूल होते. पश्चिम दिशेच्या कोपऱ्यातून (वायव्य) बाण सोडणाऱ्या पशुपतीला देवतांनी त्याचे अनुष्ठान करायला लावले, त्यामुळे हे जाणणाऱ्यास पशुपति आग्नेय दिशेमध्ये अनुकूल होतो. उत्तर दिशेच्या कोपऱ्यातून (ईशान्य) बाण प्रक्षेपण करणाऱ्या उग्रदेवाला देवतांनी अनुष्ठक केले व हे जाणणाऱ्या पुरुषास उग्रदेव व ईशान्य दिशा अनुकूल होते.

सर्व दिशांना बाण क्षेपण करणाऱ्या ईशानदेवतेची देवांनी अनुष्ठाता म्हणून नियुक्ती केली. सर्व दिशांना गमन करणाऱ्या या व्रतधारीच्या सामर्थ्याचे वर्णन करताना हा व्रतधारी पृथ्वीच्या अंतापर्यंत गेला आणि स्वतःच समुद्र झाला, असे सांगितलेले आहे, तसेच तो ज्या राजाकडे जातो, त्या राजाचा 'अतिथी' होतो, असे म्हटलेले आहे. अग्निहोत्राच्या वेळी (सकाळी व संध्याकाळी) अग्नि प्रज्वलीत केला असता विद्वान व्रतधारी घरी आल्यास यजमानाने स्वतः आसनावरून उठून त्याचा गौरव व आदरसत्कार करावा. त्याने आज्ञा दिली असता प्रज्वलित अग्नीत आहुती देऊन यज्ञ करावा. असे जो करतो त्याला पितृयान व देवयान मार्गाचे ज्ञान प्राप्त होते. असा व्रतधारी पुरुष ज्या यजमानाकडे अतिथी म्हणून राहील तो त्याच्या पुण्यामुळे आकाशातील सर्व पुण्यवंतांना जिंकतो व चौथ्या दिवशीही तो अतिथी राहिला तर त्या यजमानास सर्व पुण्यलोकाची द्वारे मोकळी होतात. अशी या व्रतधारी पुरुषाची महती या काण्डात वर्णन केलेली आहे.

या व्रतधारी पुरुषाचे सात प्राण, सात अपान व सात व्यान पुढीलप्रमाणे–

सात प्राण– उर्ध्व (अग्नि), आदित्य, अभ्यूड (चंद्र), विभू (पवमान), योनी (उदक), प्रिय (पशु), अपरिमित (प्रजा)

सात अपान– पौर्णिमा, अष्टका, अमावास्या, श्रद्धा, दीक्षा, यज्ञ व यज्ञातील दक्षिणा

सात व्यान– भूमी, अंतरिक्ष, द्यु-लोक, नक्षत्रे, ऋतू, स्त्रियांची पुष्पितावस्था, संवत्सर देवगण ह्या प्रकारच्या लाभाचे स्वामी होतात.

या व्रतधारी पुरुषाच्या शरीरातील अवयवही देवतारूप आहेत. हा व्रतधारी पुरुष सर्वांकडून कोणत्याही काळी पूजनीय आहे, अशी त्याची महती आहे.

### षोडश काण्ड

या काण्डात ९ सूक्ते असून ऋचांची संख्या १०३ आहे.

यामध्ये दुःखापासून मुक्तता होण्यासाठी केलेल्या प्रार्थना असून पाणी आमचे पाप धुवून नष्ट करो, तसेच पाणी व अग्नि आम्हाला क्षात्रबल प्रदान करो, आम्ही रोगमुक्त असावे, वाणी सामर्थ्यवान व मधुर असावी, धनवानांमध्ये मी श्रेष्ठ व्हावे, सामर्थ्यवान व्हावे, प्राण, अपान मला सोडून न जावोत, दुःस्वप्नांपासून आमचे संरक्षण व्हावे, विजय प्राप्त व्हावा, भीतीग्रस्त मनुष्याचे पुंसत्व नष्ट होते, ते न होवो, पापमय शत्रूचा नाश होवो, अशातऱ्हेच्या प्रार्थना केलेल्या आहेत.

दुसऱ्या सूक्तात यज्ञाच्या अखेरीस किंवा श्रेष्ठ माणसाच्या दर्शनानंतर त्याचा निरोप घेताना करावयाची उत्तम प्रार्थना आहे.

### सप्तदश काण्ड

या काण्डात एकच सूक्त असून मंत्रसंख्या ३० आहे.

यातील जवळजवळ सर्वच ऋचा ह्या सूर्यदेवाला उद्देशून केलेल्या आहेत. त्याला विविध विशेषणे लावून, त्याच्या सामर्थ्याचे, अलौकिक पराक्रमाचे वर्णन करून त्याची स्तुती गाईलेली आहे आणि त्याने आम्हाला प्रदीर्घ आयुष्य द्यावे, धनधान्य, पशुधन इत्यादींनी समृद्ध करावे, सर्वप्रकारच्या सुखांनी युक्त करावे, देहपातानंतर परमेष्ठ अशा अमृतमय अवस्थेत प्रस्थापित करावे (या अवस्थेत ठेवण्यासाठी इंद्रात्मक सूर्याकडे अशा कित्येक प्रार्थना पुन्हा पुन्हा केलेल्या आहेत.), संरक्षण करावे, पापादिकांपासून रक्षण व्हावे, मृत्यूपाशापासून रक्षण व्हावे, अशा अनेक प्रार्थना कल्याणाकरिता केलेल्या आहेत.

### अष्टादश काण्ड

या काण्डामध्ये ४ सूक्ते असून एकूण ऋचांची संख्या २८३ आहे.

या काण्डातील प्रथम प्रपाठकात यम आणि यमी ह्या सहोदर भावंडांचा संवाद आहे. यमी यमापासून पुत्रप्राप्तीची इच्छा करते. सर्व यमनियमांचा नियंता आणि अत्यंत न्याय्यबुद्धीने वागणारा यम तिला नकार देतो. हा संवाद ऋग्वेद, मंडल १०, सूक्त १० मधील १४ ऋचांत समाविष्ट आहे. हा संवाद म्हणजे वेदकालीन समाजजीवन, गृहस्थाश्रम आणि न्याय्य आचार यांचे सर्वोत्तम दर्शन आहे.

यात इंद्राच्या सख्यत्वासाठी केली जाणारी एक चांगली प्रार्थना आहे. तसेच यज्ञाच्या निमित्ताने आलेल्या बर्हिषद नामक पितरांना 'आमच्यासमोर येऊन आमचे रक्षण करावे आणि प्रदान केलेल्या आहुती स्वीकाराव्यात, रोग व पाप नाश करणारे सामर्थ्य आम्हाला प्रदान करावे', अशातऱ्हेने आव्हान करून विविध मागण्या केलेल्या आहेत.

२ऱ्या सूक्तात प्रदीर्घ जीवन प्राप्त

होण्यासाठी, ज्योतिष्टोम नावाच्या यज्ञामध्ये यमाला प्रार्थना करून आहुती दिल्या जातात. ही एक चांगली प्रार्थना आहे. मर्त्यपुरुषाला यज्ञाच्या ठिकाणी पाचारण केलेले आहे. पितरांची स्तुती करून त्यांना यज्ञाच्या ठिकाणी वारंवार पाचारण केलेले आहे. या काण्डात पितरांकडे विविध इच्छा प्रगट केलेल्या आहेत.

### काण्ड एकोणीस

या काण्डात एकूण ७२ सूक्ते व ४५३ ऋचा आहेत.

प्रथम सूक्तात ज्या यजमानासाठी हा शांतियज्ञ संपन्न करण्यात येत आहे त्याचे संतान आणि पशु यांची वृद्धी करण्यासाठी देवतांना प्रार्थना केलेली आहे. या काण्डातील ६ वे सूक्त म्हणजे अथर्ववेदातील पुरुषसूक्त आहे. हे १६ ऋचांचे असून ऋग्वेदातील ऋचांचा क्रम बदललेला आहे. काही पदेही निराळी आहेत. या सूक्ताचा उपयोग भगवान विष्णूंवर अभिषेक करण्यासाठी होतो.

सूक्त ९, १० व ११ हे शांतिमंत्र म्हणून गणले जातात. मन प्रसन्न व शांत रहावे, याबरोबरच मनाच्या परिसरात येणाऱ्या अन्य गोष्टीदेखील सतत प्रसन्न रहाव्या, हा या मंत्रांचा उद्देश्य आहे. यांत अनेक देवतांची प्रार्थना केलेली असून त्या देवतांना जे जे प्रदान करण्यासारखे आहे ते ते आम्हाला कल्याणकारी, मंगलमय होवो, अशी यजमानाने याचना केलेली आहे.

यातील १६ वे सूक्त हे एक उत्तम रक्षा-स्तोत्र आहे. मुलांना लागणारी दृष्ट, अकाली वाटणारी भीती, भूतबाधा आणि उष्णतेपासून होणारे विकार होऊ नयेत म्हणून या रक्षा मंत्राचा उपयोग करण्यात येतो. ज्याला भय वाटत असेल त्या व्यक्तीचा हात हाती घेऊन ह्या ऋचा म्हणाव्यात. त्या त्या दिशेने त्या व्यक्तीच्या अंगावरून हात फिरवावा आणि अखेर त्या हातावर एक फुंकर घालावी. हे मंत्र फक्त दिवसाच म्हणावेत.

४३ व्या सूक्तामध्ये आठ ऋचा असून ब्रह्मविद म्हणून प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी यज्ञ संपन्न करून त्यात घृत आणि समिधा यांच्या आहुती अर्पण करतात.

६७ व्या सूक्तात शतवर्षांचे आयुष्य लाभावे, तोपर्यंत बुद्धी व इंद्रिये, तसेच कार्यक्षमता रहावी म्हणून सूर्याजवळ केलेली ही एक मनोरम प्रार्थना आहे. ही आठ वाक्ये अत्यंत मौलिक असून ती अस्तास जाणाऱ्या सूर्याचे दर्शन घेत उच्चारावीत. याशिवाय आप (पाणी), ज्ञानवान अग्नि, जगताचा राजा इंद्र, नक्षत्रगण, उषादेवता, पराक्रम करणारा वीर, यांची विविध प्रकारे स्तुती करून कल्याणासाठी अनेक प्रार्थना केलेल्या आहेत. तसेच निर्भय स्थिती प्राप्त होण्यासाठीही काही प्रार्थना केलेल्या आहेत.

१७ वे सूक्त हे सुरक्षा मंत्र म्हणून प्रसिद्ध आहे. यात एकूण १० ऋचा आहेत. या मंत्राच्या सहाय्याने विविध देवतांपासून संरक्षण प्रार्थिलेले आहे. तसेच विविध देवतांना आमच्या आहुती समर्पित होवोत, असे सांगणाऱ्याही ऋचा या काण्डात समाविष्ट आहेत. राष्ट्राच्या कल्याणासाठी, धनसमृद्धीसाठी, यशप्राप्तीसाठीही प्रार्थना केलेल्या आहेत. दर्माची श्रेष्ठता सांगणाऱ्याही बऱ्याच ऋचा यात आढळतात.

औदुंबर वृक्षासंबंधीच्या ऋचा ३१ व्या सूक्तात असून या वृक्षाची विविध प्रकारे स्तुती गाऊन औदुंबर वृक्ष इच्छित फलाचा वर्षाव करणारा, तसेच सर्वप्रकारच्या औषधी उपलब्ध करून देणारा आणि शत्रूचा नाश करणारा असा आहे, असे सांगितलेले आहे.

३४ व्या सूक्तात जंगिड नामक औषधी सर्वांचे भय दूर करणारी, मनुष्य आणि पशु यांचे रक्षण करणारी, कृत्या नामक स्त्रीचे निर्दालन करणारी, कानात बसणारे दडे किंवा आवाजाला येणारा घोगरेपणा, शिरवेदना, नाकातील दुःख किंवा कर्णवेदना ती दूर करते. ही वनस्पती कंदरूप आहे. अशातऱ्हेने त्या औषधीचे गुणवर्णन केलेले आहे.

३६ व्या सूक्तात शतवार नामक अनेक असाध्य रोगांचा परिहार करणारी, तसेच राक्षसांचे भस्म करणारी, त्वचा रोगाचे निर्दालन करणारी अशा औषधी वनस्पतीचे सामर्थ्य वर्णन केलेले आहे. बलाचा लाभ व्हावा, क्षयरोग, कुष्ठरोग यांचा नाश व्हावा, बुद्धी तेज व्हावी, निरोगिता प्राप्त व्हावी, अनेक दुष्टवृत्तींचा नाश करणाऱ्या अंजनाने पापनाश व्हावा, संसारात तृप्ती, ऐश्वर्य, गुणसंपदा यांचा लाभ व्हावा, 'रात्री'च्या रक्षणामुळे आम्ही सुरक्षित रहावे, सुखलाभ व्हावा, अन्नसमृद्धता यावी, दुःखद स्वप्नांचा नाश व्हावा, आयुष्य वृद्धिंगत व्हावे यासाठी पुन्हा पुन्हा काही प्रार्थना केलेल्या आहेत.

७० व्या सूक्तात वेदमाता गायत्रीची स्तुती करून तिने आपल्याला आयुष्य, प्राण, प्रजा, पशु, कीर्ति, धन व ब्रह्मचर्य यांचे प्रथम दान करावे व नंतर तिच्या निवासस्थानी ब्रह्मलोकात गमन करावे, अशी इच्छा व्यक्त केलेली आहे.

७२, म्हणजे शेवटच्या सूक्तात ज्या स्थानाहून वेदांची उत्पत्ती झाली, ज्या स्थानातून कर्माची प्रेरणा प्राप्त होते, त्या स्थानाची व परमात्म्याची मी पुन्हा प्रतिष्ठा करीत आहे, असे सांगितलेले आहे.

### विसावे काण्ड

या काण्डात १४३ सूक्ते असून एकूण ९५८ मंत्रसंख्या आहे.

या काण्डातील जवळजवळ सर्वच सूक्ते इंद्रस्तुतीने व्याप्त आहेत. इंद्रास विविध विशेषणे लावलेली आहेत आणि त्याच्या सामर्थ्याचे वर्णन करून विविध प्रार्थना केलेल्या आहेत, तसेच त्याला वारंवार आपल्या यज्ञस्थानी येऊन सोमरस पिण्याचे आवाहन केलेले आहे, आणि त्याने ते आवाहन स्वीकारावे म्हणून वारंवार याचना केलेली आहे व त्याची स्तोत्रे गाईलेली आहेत. त्याच्या वज्राचाही महिमा वर्णन केलेला आहे.

इंद्रास ऐश्वर्यवान, मंगल, आपल्या बलाने शत्रूचा नाश करणारा, मनुष्यमात्राचे पालन करणारा, कामवान, दुःस्वप्ननाशक, बल वृद्धिंगत करणारा, रक्षक, तेज-प्रदायक, पाप निवारण करणारा, पशुधन देणारा, बुद्धिमान, अनेक कर्मे करणारा, सर्वव्याप्त धनाचा स्वामी, सत्यफलाचा स्वामी, भयनिवारक, सर्व देवतांमध्ये श्रेष्ठ, इच्छित फल प्रदान करणारा, सर्वत्र संचार करणारा, चिरतरुण, पृथ्वी व आकाशव्याप्त, काम्यवर्षक, कर्मप्रेरक, वज्रधारी, स्वर्गाधिपति, ऋत्विजांचे कल्याण करणारा, युद्धामध्ये अग्रेसर असणारा, पवित्र, विशाल, तेजस्वी, वीर्यवान, दीप्तिमान आणि कार्यसाधक, सत्यनिष्ठ, सुखदाता, स्तोत्रस्तुत, सर्वेश्वर, सोमप्राशक, धनजेता, भक्तरक्षक, सज्जनांचा अधिपती, वृत्राला ठार करणारा,

सूर्यस्वरूपी, द्रष्टा अशातऱ्हेच्या अनेक विशेषणांनी गौरविलेले आहे. त्याने यज्ञाच्या वेळी, युद्धाच्या वेळी किंवा अन्नप्राप्तीसाठी पाचारण करावे, तसेच मधुर सोमपानासाठी माध्यंदिनं यज्ञाच्या ठिकाणी येऊन आम्हाला सुख प्रदान करावे, अशा इच्छा व्यक्त केलेल्या आहेत. इंद्र हाच ब्रह्मा आहे; कारण तो महान आहे, असेही म्हटलेले आहे.

३५ व्या सूक्तात इंद्राने सोमप्राशनासाठी शीघ्रतेने यावे म्हणून मुद्दाम प्रार्थना केलेली आहे.

या काण्डातील १०१ वे सूक्त ही एक अग्नीची समृद्ध प्रार्थना आहे. अग्नी व प्रार्थना करणारा भक्त यांचे प्रियत्वाचे नाते या प्रार्थनेने साधले जाते.

१२६ व्या सूक्तामध्ये इंद्र, इंद्राणी व भगवान विष्णूंचा संवाद आहे. (ऋग्वेदाच्या १० व्या मण्डलातील ८६ वे सूक्त येथे पुन्हा उद्धृत करण्यात आलेले आहे.)

या काण्डातील शेवटच्या, म्हणजे १४३ व्या सूक्तात मंगलत्वाची प्राप्ती व्हावी म्हणून आश्विनीकुमारांजवळ केलेली एक रम्य प्रार्थना आहे.

या विसाव्या काण्डातील १२७ ते १४३ ही सूक्ते कुन्ताप किंवा खिलसूक्ते म्हणून प्रसिद्ध आहेत. या १७ सूक्तांत एकूण १९४ ऋचा किंवा मंत्र आहेत. यातील सूक्ते ही ऋग्वेदाप्रमाणेच स्तुतीसूक्तेच आहेत. अथर्ववेदाच्या १९४ मंत्रांखेरीज जे मंत्र आहेत ते विशिष्ट सूक्तांत समाविष्ट केलेले आहेत. प्रत्येक सूक्ताला नाव आहे. त्या नावाप्रमाणे एखाद्या वस्तूची माहिती, तिचा उपयोग, क्रिया, फल, प्रयोग वगैरे गोष्टींनी ही सूक्ते समृद्ध आहेत.

वेदांच्या मालिकेतील अथर्ववेद हा सर्वात शेवटचा व चौथा वेद होय! या वेदाला अन्य तीन वेदांच्या इतके महत्त्वाचे स्थान दिले गेलेले नसले तरी त्याचा अभ्यास करताना, इतकेच नव्हे, तर त्याच्या केवळ बाह्यस्वरूपाची ओळख आपण करून घेत असताना आपल्या असे लक्षात येईल की या वेदामध्ये स्थूलमानाने २४ विविध विषय, ज्यांचा या विश्वाशी कोणत्या ना कोणत्यातरी रीतीने संबंध आहे, त्याविषयी सांगितलेले असून त्या ज्ञानाचा विनियोग कसा करावा, हेही सांगितलेले आहे. सुरवातीलाच उद्धृत केलेल्या विविध विषयांवरील ही सूक्ते ही प्रापंचिकास आधारभूत ठरावीत अशीच आहेत. विविध प्रसंगी, विविध विषयांवरील प्रार्थना आणि त्या प्रार्थना म्हणावयाच्या वेळेस करावयाची कृती सविस्तर सांगितलेली आहे. थोडक्यात, अथर्ववेद हाही इतर तीन वेदांइतकाच समृद्ध आहे.

एकूणच हे वेदवाङ्मय, म्हणजे अथांग, अतिप्राचीन असा ज्ञानसागरच आहे. हे विश्वातील पहिले चिरंजिवी वाङ्मय आहे. ह्या वेदांची प्रभा सर्व विश्व व्यापून राहिलेली आहे. त्या प्रभेचा प्रत्येक कण या विश्वाशी निगडीत आहे. जगाच्या कल्याणासाठी केलेल्या प्रार्थना आणि त्यासाठी निरनिराळ्या देवतांकडे मागितलेले विविध आशीर्वाद हे मनुष्यप्राण्यासाठी एक वरदानच आहे. वेदांतील विविध विषय हे जसे आपल्याला त्यांच्या विषयांची, त्या काळातल्या अस्तित्वाची जाणीव करून देतात तसे तेच विषय सद्यकाळाच्या परिस्थितीशी आत्ताही किती निगडीत आहेत आणि त्यासाठी काय उपाय करावेत याचाही मार्ग सुचवतात. त्यासाठी कोणत्या क्रिया कराव्यात, कोणते मंत्र (पूर्णत्वाने माहिती करून) उपयोगात आणावेत आणि कोणत्या प्रार्थना कोणत्या देवतांना कराव्यात याचेही मार्गदर्शन करतात. याशिवाय त्या त्या देवतांचे गौरवी दर्शनही ऋग्वेदासारख्या वेदामधून आपल्याला घडते. विविध देवता आणि त्यांचे अलौकिक सामर्थ्य, तसेच त्यांचे विश्वव्यापी कर्तृत्वही त्यातील ऋचांमधून दृग्गोचर होते. सामान्यांचा आवडता शृंगारही त्यात आढळून येतो.

'ऋग्वेद' हा वेदांच्या मालिकेतील सर्वात मोठा आणि प्रथम क्रमांकाचा वेद होय! 'यजुर्वेदा'चा क्रमांक ऋग्वेदाखालोखाल लागतो. द्वितीय क्रमांक असलेल्या या वेदाची, ऋग्वेदातील मंत्रांच्या विनियोगे यज्ञाच्या माध्यमातून देवत्वाची दीप्ति अनुभवण्यासाठी साथ लागते. तृतीय क्रमांकाचा वेद हा 'सामवेद' होय! भगवंताचे स्वरूप सामवेदात पहायला सापडते, असे भगवान श्रीकृष्ण म्हणतात, तर महाभारतात व्यासांनीही या वेदाची स्तुती केलेली आहे. सर्व वेदांत या वेदाला भगवंतांनी विशेष गौरविलेले आहे आणि सर्वात शेवटचा चतुर्थ क्रमांकाचा वेद, म्हणजे 'अथर्ववेद' होय! हा इतर वेदांइतका प्राचीन नसला तरी विविध विषयांनी व्याप्त असून अत्यंत गौरवपूर्ण असाच आहे. मात्र, प्रापंचिक समृद्धतेसाठी या वेदाचा अधिक सूक्ष्म आणि प्रयोगनिष्ठ अभ्यास होणे जरूरीचे आहे. वेदांमध्ये पठणाइतकेच त्या वेदांच्या अक्षरांच्या उच्चारालाही अत्यंत महत्त्व आहे. हे वेद 'श्रवण' केल्याशिवाय उच्चारताच येत नाहीत, म्हणून परंपरेने पाठ केले गेल्याने त्यांचे ताजेपण अजूनही तितकेच टिकून आहे. त्यातील मंत्रांचा उच्चार नादमय, अर्थमय आणि निष्ठेने परिपूर्ण असा व्हायला हवा, म्हणजेच त्या वेदांच्या अंतरंगातील महान असे दिव्य ज्ञान हळूहळू दृग्गोचर होत जाईल. मानवाची आयुमर्यादा अगदी शंभर वर्षे धरली तरी वेदांच्या अभ्यासासाठी ती केव्हाही पुरी पडणार नाहीत, याची कल्पना असली आणि या नादांप्रत पोचण्यासाठी गुरुच्या सान्निध्याची, प्रत्येक पायरी ओलांडण्यासाठी आवश्यकता असली तरीदेखील भिऊन जाण्याचे कारण नाही. आपल्यासारख्या सामान्यजनांसाठी त्यांच्या (वेदांच्या) बाह्यस्वरूपाची ओळखही तितकीच महत्त्वाची आहे आणि ''ह्या वेदांत आहे तरी काय?'' याची आपल्याला पुसटशी कल्पना जरी आली आणि थोडासा जरी उलगडा झाला तरी खूपच समाधानाची गोष्ट मानावी लागेल. जसजसे आपण अधिक खोलात शिरून त्या त्या वेदाचे अध्ययन करू तसतसे त्याचे अधिक आकलन आपल्याला होत जाईल. जगाच्या कल्याणासाठी ज्या महर्षींनी हे वेद आपल्यासमोर समर्थपणे मांडून जगाला हे ज्ञानाचे दालन उघडे करून दिले त्या थोर तपस्वी प्रज्ञावंतांना पुन्हा एकदा मनोभावे त्रिवार वंदन असो!

**आपले वेद आपली पुराणे**

ठेव योजनेतील
ग्रंथ– सामवेद

**लेखक– स. कृ. देवधर**

**प्रकाशक– श्री. मनोहर य. जोशी**
प्रसाद प्रकाशन,
१८९२ सदाशिव पेठ,
पुणे–४११०३०.

# श्री साईभक्तांना नम्र आवाहन

शिरडी संस्थान हे देशभर भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेतील श्री साईबाबांच्या लाखो भक्तांचे तीर्थयात्रेचे व श्रद्धेचे स्थान झालेले आहे. प्रत्येक दिवसागणिक भाविकांची वाढती लोकप्रियता या संस्थानला लाभली असून त्याची भारतातील एक प्रमुख विश्वस्तनिधि म्हणून गणना होत आहे.

गेली काही वर्षे साईभक्तांच्या सतत वाढणाऱ्या गर्दीमुळे श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या विविध सोयींवर अतोनात ताण पडत आहे. या लाखो भाविकांना शिरडीचा निवास सुखाचा व सोईचा व्हावा म्हणून श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे विद्यमान विश्वस्त मंडळ शिरडीच्या सर्वांगीण विकासासाठी अनेकविध योजना राबवित आहे.

'साईबाबा–भक्त–निवास' या इमारतीचे बांधकाम हाती घेऊन ५०० भाविक कुटुंबांची राहण्याची सोय करण्याच्या दृष्टीने संस्थानने पहिले पाऊल उचलले. या इमारतीचे बांधकाम आता पूर्ण झाले असून ही इमारत भाविकांना निवासाकरिता लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या खोल्यांमधून भाविकांना सर्व सोयी स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. माफक दरात येथे भाविकांची राहण्याची सोय करण्यात आली आहे. याशिवाय सध्या उपलब्ध असलेल्या सभागृहापेक्षा मोठे, असे २ सभागृह बांधण्यात आले आहेत. या सोयीमुळे सुमारे ३,५०० अतिरिक्त भाविकांची उत्तम व्यवस्था येथे होणार आहे. तसेच रात्रंदिवस सेवा चालू असेल असे एक खाद्य-पेयगृहही त्याच जागेत आहे.

भाविकांची प्रत्यही वाढणारी संख्या लक्षात घेऊन **मंदिर–परिसराच्या विस्तारीकरणाची योजनाही** हाती घेण्यात आली आहे. या विस्तारीकरणामुळे श्री साईबाबांचे दर्शन भाविकांना सुलभतेने व सहजतेने घेता येणार आहे. त्यांचा सध्याचा त्रास त्यामुळे कमी होईल.

विद्यमान विश्वस्त मंडळाने **स्वच्छ व मुबलक पाणी, उत्तम वैद्यकीय सेवा, हृदयरोग अतिदक्षता विभाग, सोनोग्राफी केंद्र, क्ष–किरण कक्ष, इंग्रजी माध्यमाची शाळा, कन्याशाळा, संस्थानच्या उत्पन्नात वाढ,** कामात सूसूत्रीपणा आदी योजनांना दृश्यरूप दिले असून **मंदिर–परिसराचे विस्तारीकरण, रुग्णालयाचा विस्तार,** आदी योजनाही लवकरच दृश्यरूप धारण करणार आहेत.

श्री साईबाबांच्या कृपेने व आशीर्वादाच्या बळावर संस्थानने वरील नमूद केलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतलेले आहेत. आपली मदत आम्हाला हरतऱ्हेने हवी आहे. भारताच्या उज्ज्वल धार्मिक परंपरेचे संवर्धन या प्रकल्पाकरिता 'देणगी' दिल्याने होणार आहे.

शिरडी संस्थानच्या वतीने मा. अध्यक्षा आपणाला या कार्याकरिता उदारहस्ते मदत करण्याचे विनम्र आवाहन करीत आहेत.

कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी
मु. पो.: शिरडी, तालुका: कोपरगांव,
जिल्हा: अहमदनगर.


सूचना: चेक **'श्री साईबाबा संस्थान, शिरडी'** या नावाने पाठवावेत.



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ

प्रा. डॉ. लेखा पाठक (अध्यक्षा)
श्री. हेमराज शहा
श्री. मनोहर ना. गोगटे
श्री. ब्रिजमोहन भामशा
श्री. पृथ्वीराज रा. आदिक
श्री. शिवराम रा. शिंदे
श्री. राजीव प्र. कुलकर्णी
डॉ. एकनाथ भा. गोंदकर
श्री. प्रभाकर तु. बोरावके
श्री. भिमाशंकर व्यं. खांबेकर
श्री. बाबुराव अ. नरोडे (पाटील)
श्री. दादासाहेब श. रोहमारे (पाटील)
श्री. प्रभाकर भि. बोरावके
श्री. उत्तमराव रं. शेळके
श्री. सोपानराव मा. धोर्डे
श्री. कारभारी भि. देवकर
श्री. अनंतकुमार कि. पाटील
श्री. मोतीराम सि. पवार
श्री. प्रशांत व्यं. हिरे
प्रा. नारायण स. फरान्दे (आमदार)
श्री. अण्णासाहेब म्हस्के (आमदार)
श्री. दिलीप अ. शिंदे
श्री. गोपीनाथ ब. कोते (पाटील)
श्री. श्रीपतराव मा. जाधव
श्री. मोहन मो. जयकर
श्री. विष्णुपद श्री. बुटे
(कार्यकारी अधिकारी)






श्री हाजी अब्दुल बाबा
समाधी – १९५४


श्री भाऊ महाराज कुंभार
समाधी – १९३८



Registered with the Registrar
of News-papers of India No. MH/527



गणेश मंदिर



महादेव मंदिर

श्री साईबाबांनी त्यांचे एक निस्सीम भक्त श्री. तात्या पाटील यांच्याकडून शिरडीतील शनि, गणपति, शंकर, पार्वती, हनुमान आदी ग्रामदेवतांच्या मंदिरांची डागडुजी करून घेतली.

मारूति मंदिर




शनि मंदिर

